मुख्यकार्यालय, विरार
विरार (पुर्व),
ता. वसई, जि. पालघर, पिन 401305

वसई-विरार शहर महानगरपालिका
स्थापना : ३ जुलै २००९

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावकक्र. : व.वि.श.म./प्रसमी/९८९/२०-२१
दिनांक : १८/०१/२०-२१

# जाहिर दरपत्रक सुचना

याद्वारे सर्व संस्था व व्यक्ती यांचे माहितीसाठी कळविण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपलिका प्रभाग समिती सी चंदनसार येथील खालील तपशिलात नमुद केल्या प्रमाणे चे तलाव मत्स्य पाळण्यासाठी द्यावयाचे आहेत. तरी इच्छुक व्यक्ती व संस्था यांचे कडुन दि.२७/०१/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता बंद पाकिटातून दरपत्रक (कोटेशन) मागविण्यात येत आहेत. सदरची दरपत्रके प्रभाग समिती सी चंदनसार विरार (पूर्व) आवक जावक विभागात सादर करण्यात यावी.

| अ.क्र. | विभाग | तलावाचे नांव | अपेक्षित रक्कम सन. २०२१ ते २०२३ |
|---|---|---|---|
| १. | दहिसर | दहिसर मोठा तलाव | ३०४०१ - ०० |

**अटी व शर्ती**

१. व्यक्ती ह्यांनी स्वत:च्या नावाने व संस्था यांनी स्वत:चे लेटरपॅडवर दरपत्रक सादर करावे.

२. मालकाचे/संस्थेचे पॅनकार्ड झेरॉक्स प्रत जोडण्यात यावे.

३. दरपत्रक मुदतीमध्ये व वेळेमध्ये प्रभाग समिती "सी" चंदनसार कार्यालय विरार (पूर्व) दुसरा मजला **आवक-जावक विभाग** येथे सादर करणे आवश्यक राहील.

४. दरपत्रकास मंजुरीची समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहून करारनामा करुन ७ दिवसांत करारनामा करावयाचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.

५. ज़ास्त देकार देणाऱ्या व्यक्ती अथवा संस्था ह्यांचे दरपत्रक मंजुर करणेत येईल व मंजुर रक्कमेवर शासनाकडून प्राप्त झालेल्या दरानुसार आयकर व GST वेगवेगळा भरणा करावा लागेल.

६. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार मा.सहा.आयुक्त यांना राहील.

७. वरील अटींचे पालन जे व्यक्ती /संस्था करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यात येईल.

८. यासंबधींची दरपत्रके बंद पाकिटातून दि.२७/०१ /२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता प्रभाग समिती सी चंदनसार विरार (पूर्व) मासळी मार्केट दुसरा मजला **आवक-जावक विभाग** येथे सादर करावीत.

मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि.२७/०१/२०२१ रोजी सायं. ४.०० वाजता मा.सहा.आयुक्त यांचे दालनात उपस्थित दरपत्रकदार अथवा त्यांचे प्रतिनिधी ह्याचे समक्ष उघडण्यात येतील.

स्थळ :- प्रभाग समिती "सी" चंदनसार
दिनांक :- १८/०१/२०२१

वसई विरार शहर महानगरपालिका ★ जि. पालघर ★

( सुभाष जाधव )
प्र.सहा.आयुक्त
प्रभाग समिती "सी" चंदनसार
वसई- विरार शहर माहनगरपलिका

Scanned with CamScanner